**महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण**
**गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१**
**आदेश क्र.प्राधि/पदोन्नती/बदल/सहायक/२०२५/ E-6551055 /प्र. ८**
**दिनांक:- 22 AUG 2025**

संदर्भ - १. म्हाडा प्राधिकरणाचे वरिष्ठ लिपीक (गट-क) या संवर्गातून सहायक (गट-क) या संवर्गातील पदोन्नती आदेश क्रमांक- प्राधि/पदोन्नती/सहायक/२०२५/६२००८१६, प्र.८/दिनांक-२४.०७.२०२५.

२. श्री. देवीदास सिताराम सोनावणे, वरिष्ठ लिपीक (दिव्यांग कर्मचारी) यांचा दिनांक-२७.०७.२०२५ रोजीचा सहायक या पदोन्नती आदेशामधील पदस्थापनेत बदल करण्याबाबतचा विनंती अर्ज.

आदेश-

म्हाडा प्राधिकरण व अधिनस्त विभागीय मंडळामधील कार्यरत वरिष्ठ लिपीक (गट-क) या संवर्गातील कर्मचारी यांना सहायक (गट-क) या संवर्गात उक्त नमूद दिनांक-२४.०७.२०२५ रोजीच्या संदर्भांकित कार्यालयीन आदेशान्वये पदोन्नती देण्यात आलेली होती. सदरील पदोन्नती आदेशामध्ये अनु क्र. १२ वरील श्री. देवीदास सिताराम सोनावणे (वरिष्ठ लिपीक/मुंबई मंडळ) (दिव्यांग कर्मचारी) यांची सहायक (गट-क) या संवर्गातील पदोन्नतीची पदस्थापना उपमुख्य अधिकारी/पणन/मुंबई मंडळ यांच्या कार्यालयातील सहायक (गट-क) या रिक्त पदी करण्यात आलेली होती.

संदर्भ क्र.२ अन्वये या कार्यालयास श्री. देवीदास सिताराम सोनावणे (वरिष्ठ लिपीक/मुंबई मंडळ) (दिव्यांग कर्मचारी) यांचा पदोन्नतीनंतरच्या पदस्थापनेत बदल करण्याबाबतचा विनंती अर्ज प्राप्त झालेला होता. श्री. देवीदास सिताराम सोनावणे हे दिव्यांग कर्मचारी असून महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग यांच्या दि.१५.१२.२००४ रोजीच्या शासन निर्णयातील तरतुदींच्या अनुषंगाने श्री. देवीदास सिताराम सोनावणे (वरिष्ठ लिपीक/मुंबई मंडळ) यांच्या पदोन्नती आदेशामध्ये खालीलप्रमाणे पदस्थापनेत बदल करण्यात येत आहे.

| अ.क्र. | कर्मचारी नाव व पदनाम | सध्याचे कार्यालय व मंडळ | पुर्वी दिलेल्या पदोन्नतीचे कार्यालय व मंडळ | सुधारित आदेशानूसार पदोन्नतीनंतरचे कार्यालय व मंडळ | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | श्री. देवीदास सिताराम सोनावणे (वरिष्ठ लिपीक/मुंबई मंडळ) (दिव्यांग कर्मचारी) | मुंबई मंडळ | उपमुख्य अधिकारी/ पणन/मुंबई मंडळ | पुणे मंडळ | रिक्त पदी |

२/- उक्त नमूद संदर्भ क्र. १ मधील पदोन्नती आदेशामधील नमुद करण्यात आलेल्या अटी व शर्ती क्र. १ ते १३ मधील उर्वरित मजकूर जसा आहे तसाच लागू राहील याची नोंद घ्यावी.

सदरहू आदेश तात्काळ अंमलात येतील.

**(मा.उपाध्यक्ष तथा मु.का.अ./प्रा. यांचे मान्यतेने)**

**(नीलिमा धायगुडे)**
**सचिव/प्राधिकरण**

प्रति,

---------------------------------------------------

(संबंधित विभागप्रमुख यांच्यामार्फत)

**प्रत सस्नेह अग्रेषित:**

१. मा.मुख्य दक्षता व सुरक्षा अधिकारी/प्रा.
२. मा.मुख्य अधिकारी, मुंबई मंडळ
३. उपमुख्य कार्यकारी अधिकारी/प्रा.
४. मुख्य अधिकारी, पुणे मंडळ
५. चौकशी अधिकारी/प्रा.
६. मुख्य जनसंपर्क अधिकारी/प्रा.
७. सहमुख्य अधिकारी, मुंबई मंडळ
८. मुख्य मा.व सं.तं.कक्ष/प्रा. (संकेतस्थळावर प्रसिध्द करणेकरीता)
९. मुख्य लेखाधिकारी, मुंबई मंडळ
१०. लेखा अधिकारी/प्राधिकरण/मुंबई मंडळ/पुणे
११. सहाय्यक लेखाधिकारी/मुंबई मंडळ
१२. निवासी लेखा परिक्षा अधिकारी/प्रा.
१३. संचालक, पी.डी.सी. पुणे.

**प्रत माहितीस्तव सविनय सादर -**

मा. उपाध्यक्ष/प्रा. यांचे विशेष कार्य अधिकारी.
प्रत: प्रशासकीय अधिकारी -२ प्राधिकरण/मुंबई मंडळ/पुणे मंडळ
प्रत: कार्यासन अधिकारी/प्रशासन शाखा/मुंबई मंडळ, सचिव/मुंबई मंडळ

**प्रत माहितीसाठी :-**

१. मा.उपाध्यक्ष/प्रा. यांचे स्वीय सहाय्यक.
२. अध्यक्ष, महाराष्ट्र गृहनिर्माण कर्मचारी संघटना.
३. प्रधान कार्यवाह, मागासवर्गीय कर्मचारी संघटना.
४.अध्यक्ष, ग्रॅज्युएट इंजिनिअर्स असोसिएशन ऑफ म्हाडा, मुंबई.
५. अध्यक्ष, महाराष्ट्र हाऊसिंग बोर्ड एम्पलॉईज को. ऑप. क्रेडीट सोसायटी लि., मुंबई.
६. अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य अपंग कर्मचारी संघटना, मुंबई.

**प्रत:** प्रशासन - ६,९,१०,११,१२,१३,१४(अ),१४(ब)/प्रा.
**प्रत:** निवडनस्ती करिता.